## बी.एड्. व एम.एड्. दोन वर्षीय अभ्यासक्रम उद्बोधन कार्यशाळा






## अक्षरसंस्कार कार्यशाळा






## स्वसंरक्षण कार्यशाळा









दि. ९/२/२०१६ रोजी डॉ. प्रा. जोशी मॅडम यांनी संशोधनाची उद्दिष्टे कशी लिहायची, त्याचप्रमाणे परिकल्पना व त्याचे प्रकार ही स्पष्ट करून सांगितले. त्यानंतर डॉ. प्रा. भडंगे मॅडम यांनी शैक्षणिक संशोधन पद्धती, सर्वेक्षण पद्धत, सर्वेक्षण पद्धतीचे फायदे आणि प्रकार स्पष्ट करून सांगितले.

दि. १०/२/२०१६ रोजी मार्गदर्शक डॉ. प्रा. पगारे सर यांनी जनसंख्या, नमुना निवड, माहिती संकलनाची साधने समजावून सांगितली. त्यानंतर मिश्रा मॅडम यांनी संदर्भसूची व वेळापत्रक, अंदाजपत्रक याबद्दल मार्गदर्शन केले.

## SPSS चा संशोधनात वापर

दि. ३१ मार्च २०१६ रोजी SPSS चा संशोधनात वापर यावर राज्य स्तरावरील कार्यशाळा आयोजित केली होती. त्यामध्ये संशोधनात SPSS चा वापर कशा प्रकारे करायचा या संदर्भात डॉ. सुर्यभान सनान्से, संख्याशास्त्र विभागप्रमुख यांनी मार्गदर्शन केले.

## Use of ICT in Research संशोधनात संगणकाचा वापर

दि. १/४/२०१६ रोजी संशोधनात संगणकाचा वापर कसा ? केव्हा ? आणि कशा स्वरूपात करायचा तसेच ms-word व ms-exel याचा वापर कसा करता येईल यासंदर्भात हनुमंत गुट्टे यांनी M.Ed. प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## E-content Development in Regional languages. या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा

दि. २२ व २३ मार्च रोजी शिक्षणशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय स्तरावरील e-content Development in Regional languages यावर दोन दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. दि. २२ मार्च रोजी कार्यशाळेचे उद्‌घाटन डॉ. वीर यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेस कुलसचिव डॉ. लोखंडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उद्‌घाटनानंतर राजकोट येथील तज्ञ मार्गदर्शक डॉ. घेटिया, डॉ. दिप्ती कुंदल यांनी e-content विकसित करण्याच्या पायऱ्या स्पष्ट केल्या. दुपारच्या सत्रात डॉ. जिवानी यांनी आवश्यक विविध e-content साठी electronic media नेटद्वारे स्पष्ट केले १ ते कन्टेन्टसाठी कसे वापरायचे हेही सांगितले.

**दिवस दुसरा -** दुसऱ्या दिवशी दि. २३/०३/२०१६ रोजी डॉ. जिवानी यांनी website तयार कशी करायची साईट बनवायला लावली. दुपारच्या सत्रात प्रत्यक्ष संगणकावर सर्वांनी प्रात्याक्षिक केले. त्यानंतर दुपारी चार वाजता मा. कुलगुरू प्रो. चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली समारोपाचा कार्यक्रम पार पडला.

## बी.एड्., एम.एड्. दोन वर्षीय अभ्यासक्रम उद्‌बोधन कार्यशाळा

दि. ३१/०८/२०१५ रोजी शिक्षणशास्त्र विद्याशाखा व शिक्षणशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने NCTE रेग्युलेशन २०१४ च्या निकषांनुसार बी.एड्. व एम.एड्. चा दोन वर्षीय अभ्यासक्रम तयार करण्यात आला. त्याच्या अंमलबजावणीसंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी एक दिवसीय उद्‌बोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेस अधिष्ठाता तथा विभागप्रमुख डॉ. शोभना जोशी यांनी अभ्यासक्रमाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व बी.एड्. व एम.एड्. महाविद्यालयातून प्राचार्य व एक जेष्ठ प्राध्यापक अशा दोन व्यक्ती उपस्थित होत्या.

*****